**नि.फौ.ख.क्र. ४०/२०११**
**निशाणी क्र. ११**

**<u>दोषारोप पूर्वीचा पुरावा</u>**

**<u>पुढील सरतपास फिर्यादी पक्षातर्फे ॲड श्री. एस. एच. साबळे यांचे मार्फत शपथेवर पुढे सुरु</u>**

आरोपींनी मला बनावट जप्तीची नोटीस पाठविली त्यामुळे माझे स्वास्थ बिघडले, समाजात असलेली प्रतिष्ठा कमी झाली व माझी मानहाणी झाली. त्याबाबत मी आरोपींना दिनांक ११/०१/२०११ रोजी रजिस्टर पोस्टाने नोटीस पाठविली. त्या नोटीसीस त्यांनी मला खोटे—नाटे उत्तर दिले. त्यांनतर मी दिनांक ०२/०४/२००९ रोजी वालचंदनगर पोलिस स्टेशन येथे रितसर तक्रारी अर्ज दाखल केला व त्याच्या अनेक प्रती वरिष्ठ अधिकारी यांना पाठविल्या. त्यानंतर दिनांक ०२/०३/२०११ रोजी पुन्हा वालचंदनगर पोलिस स्टेशन येथे तक्रारी अर्ज दाखल केला परंतु पोलिसांनी माझी तक्रार नोंदवून घेतली नाही व मला न्यायालयात जाण्याचा सल्ला दिला म्हणून मी सदरची फिर्याद दिली आहे. मला असे वाटते की, आरोपींनी बनावट कागदपत्रे तयार करून मला जप्तीची नोटीस पाठविली त्यामुळे त्यांना कडक शासन व्हावे.

आता मला वालचंदनगर को. हाऊसिंग सोसायटी नं. २ मर्यादित यांनी दिनांक २०/०३/२००९ रोजी फायनान्सीयल थकित कर्जाबाबत नोटीस पाठविली होती त्यावर सेक्रेटरी वालचंनगर को. ऑ. सोसायटी यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यास **निशाणी क्र. ३२** देण्यात येते. आता मला दिनांक २८/०८/२००२ रोजीची महाराष्ट्र राज्य को. ऑ. सोसायटी फायनान्स कार्पोरेशन यांच्या अनुक्रमे दोन पावत्या दाखविण्यात आल्या त्यावर माझे नाव आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **निशाणी क्र. ३३ व ३४** देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपींचे वकील श्री. एन. जी. शहा यांचे मार्फत</u>**

(उलटतपास राखुन ठेवण्यात येतो.)

माझे समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

JYOTI BABURAO KHATAWKAR Digitally signed by JYOTI BABURAO KHATAWKAR Date: 2023.09.02 17:46:05 +0530

(जे. बी. खटावकर)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापुर.

दिनांक ०२/०९/२०२३